

# ‘सुंदर मजेत’ जगणा

अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि निरुपण या क्षेत्रांत डॉ. अशोक रानडे यांचा दबदबा आहे. माट्यांच्या शब्दांत सांगायचं झालं तर ‘दबदबाट’ आहे. परंतु या सगळ्याच्याही पलीकडे ते उभे आहेत : भारतीय संस्कृतीचे एक चतुरस्त्र, रसिक भाष्यकार म्हणून... एक संपूर्ण स्वायत्त व्यक्तिमत्त्व म्हणून!

व्यासंगी माणूस हा आत्ममग्न असतो. एकटेपणात रमलेला असतो. हे एकटेपण (एकलेपण किंवा एकाकीपण नव्हे!) त्यानं आपणहून स्वीकारलेलं असतं. डॉ. अशोक रानडे आत्ममग्न, एकटे असे जगले, जगताहेत. जाहीर कार्यक्रमांतला सहभाग संपला की ते निर्लेपपणानं कार्यक्रमानंतरच्या सोपस्कारांकडं, विभ्रमांकडं पाठ फिरवून घरचा रस्ता धरतात. असं असूनही डॉ. रानडे यांना खूप मित्र आहेत. बीथोव्हन, बेगम अख्तर, बागडेबुवा, बर्मनदादा या मंडळींना जोडणारा समान दुवा म्हणजे डॉ. रानडे. अण्णासाहेब किर्लोस्कर ते पिरांदेलो, मेनुहिन ते मल्लिकार्जुन मन्सूर, नांदी ते नजम असा हा फार मोठा पट आहे. हे सगळं कसं काय जमतं, असं विचारण्याची सोय नाही. कारण डॉ. रानडे यांना वर्तमानपत्रीय प्रश्न रुचत नाहीत.

जगण्याच्या प्रचंड अन् अव्याहत अशा संघर्षात माणूस भरडून निघत असतो. परंतु त्याला ओढ असते एका अलौकिक क्षणाची. प्रतिभेचा स्फोट झाला की माणसाच्या वाट्याला हा अलौकिक क्षण येतो. माणसाचं आयुष्य उजळून निघतं. कलेची ही सगळी प्रक्रिया अद्भुत अन् गुंतागुंतीची असते. माणसाला आपणहून ती कळत, समजत नाही. ती प्रक्रिया व्यवस्थित समजावून सांगावी लागते. समाजाला अशा रसिक मित्राची गरज भासते. असा मित्र बहुश्रुत असतो, त्याच्या वृत्ती आनंदी असतात आणि त्याचं एकूण जगणं रसिकाचं असतं. त्याच्या मनात एक तीव्र संवेदना ठसठसत असते. अशा दुर्मिळ श्रेणीत डॉ. रानडे आहेत. प्रो. बी. आर. देवधर, गोविंदराव टेंबे, केशवराव भोळे हेही या श्रेणीतले. डॉ. रानडे आपल्या ज्येष्ठ, गुणवान पूर्वसुरींपेक्षा दहा पावले पुढं गेले. याला कारण असं की, म्युझिकॉलॉजी या शास्त्रानं गेल्या पंचवीस-तीस वर्षांत बरीच मजल गाठलीय. या क्षेत्रात जगभर बरंच काही मूलभूत असं संशोधन सुरू आहे. दळणवळणाच्या आधुनिक सोयींमुळे हे संशोधन अभ्यासकांना सहज उपलब्ध होत असतं. त्यामुळे डॉ. रानडेंच्या कामाचा पट फार मोठा आहे. दुसरं- आपल्या सांगीतिक विचारांना डॉ. रानडेंनी सादरीकरणाचा एक लखलखीत संदर्भ दिलाय. संशोधनातला किती भाग रसिकांसमोर कार्यक्रमाच्या रूपाने मांडता येईल अन् कसा, हा विचार त्यामागे होता.

संस्कृतीला अनेक आयाम असतात. अनेक नद्या-उपनद्या, ओढे-निर्झर येऊन मिळाल्यामुळे लोकसंस्कृतीचं पात्र विस्तारतं, उजळून निघतं, हे एक सुभाषित म्हणून (अनेकता में एकता) आपल्याकडे मान्य करतात. त्याही पुढे जाऊन डॉ. रानडेंनी संगीत, कला आणि रंगभूमी हे विषय जगण्याच्या धकाधकीशी जोडून टाकले. हे त्यांचं फार मोठं काम. त्यांनी परंपरा आणि संस्कृतीकडे पाहण्याची पद्धतच बदलून टाकली. त्यामुळे एक निकोप, व्यापक दृष्टिकोन तयार होण्यास मदत झाली.

मराठी नाट्यसंगीताचा विचार केवळ घराण्याच्या संदर्भात करून चालणार नाही, हे स्पष्ट झालं. गुब्बी, वीरण्णा, भवाई, गुजराती- पारशी रंगभूमी असे टप्पे घेणं गरजेचं आहे. त्यामुळे अभिजात मराठी रंगभूमीचा विस्तार आपल्या लक्षात येतो. हा डॉ. रानडेंचा विचार आहे. ‘संशयकल्लोळ’ हे नाटक धनिक भाटिया शेट

जगण्याच्या प्रचंड अन् अव्याहत अशा संघर्षात माणूस भरडून निघत असतो. परंतु त्याला ओढ असते एका अलौकिक क्षणाची. प्रतिभेचा स्फोट झाला की माणसाच्या वाट्याला हा अलौकिक क्षण येतो. माणसाचं आयुष्य उजळून निघतं. कलेची ही सगळी प्रक्रिया अद्भुत अन् गुंतागुंतीची असते. माणसाला आपणहून ती कळत, समजत नाही. ती प्रक्रिया व्यवस्थित समजावून सांगावी लागते. समाजाला अशा रसिक मित्राची गरज भासते. असा मित्र बहुश्रुत असतो, त्याच्या वृत्ती आनंदी असतात आणि त्याचं एकूण जगणं रसिकाचं असतं. त्याच्या मनात एक तीव्र संवेदना ठसठसत असते. अशा दुर्मिळ श्रेणीत डॉ. अशोक रानडे आहेत.

मंडळी आणि गोव्याच्या खानदानी कलावंतीणी या नाजूक भावबंधाला रेलून उभं आहे, हे आपण लक्षात घेतलं की मग वणिक-व्यापारी समाजाच्या ‘पेट्रनाज’ संस्कृतीचा आवाका आपल्याला समजतो. सलिल चौधरींचं पाश्चात्य सिंफनी, बीथोव्हन या गोष्टींशी बरंच जुळतं, हे कळलं की मग ‘इतना न मुझसे तू प्यार बढा’ या गीतातली गोम आपल्याला समजते.

कोणत्याही विशिष्ट धार्मिक, वांशिक अथवा भाषक गटाचं, लोकसमूहाचं संस्कृतीवर वर्चस्व नसतं, हे डॉ. रानडेंचं मुख्य प्रतिपादन आहे असं मी मानतो. त्यामुळे त्यांच्या संशोधनाची, सांगीतिक विचारांची आणि प्रयोगांची मूळ बैठक ही पूर्णपणे लोकशाहीप्रधान आहे. अन् तरीही ‘डॉ. रानडेंची मांडणी फार जड असते, ‘एलिटिस्ट’ असते,’ असा गलका झालाच. याला कारण लोकशाहीचा आपण काढलेला चुकीचा अर्थ. लोकशाहीला ‘इंटलेक्च्युअल ॲरिस्टोक्रसी’ची जोड दिली पाहिजे, असे डॉ. राधाकृष्णन् म्हणत. आपण ते मनावर घेतलं नाही. याचा विपरित परिणाम असा झाला की, लोकसंस्कृतीचा अभ्यास लोकप्रिय पद्धतीनं, लोकानुनयाची कास धरून झाला पाहिजे, असा चमत्कारिक समज आपल्याकडे रुढ झाला. अशा चर्चेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून डॉ. रानडेंनी आपले काम व्रतस्थपणे सुरू ठेवलं, हेसुद्धा आपलं भाग्य. लोकसंस्कृतीचा सर्वंकष आणि सांगोपांग अभ्यास करणारी, या विषयाकडे पूर्णपणे गांभीर्यानं पाहणारी तरुण संशोधक- अभ्यासकांची एक पिढी डॉ. रानडेंविषयी नेहमीच कृतज्ञ राहील.

मार्च १९८६ च्या आगेमागे मी राष्ट्रीय संगीत नृत्य-नाट्य केंद्राच्या रंगभूमी विकास प्रकल्पात दाखल झालो. फोर्ड फाऊंडेशनचे अर्थसहाय्य लाभलेल्या या प्रकल्पाचा दस्तावेजीकरण हा मुख्य हेतू होता. रंगभूमीशी संबंधित अस्सल साधनांचं संकलन, ज्येष्ठ कलावंतांचं ध्वनिमुद्रण असं प्रकल्पाचं स्वरूप होतं. डॉ. रानडेंची एनसीपीएत भेट झाली. त्यांनी काम काय आहे, कसं करायचं, ते थोडक्यात समजावून सांगितलं. ‘इथं तुला खूप शिकायला मिळेल, कान- डोळे उघडे ठेव,’ असं ते म्हणाले. तीन-चार दिवसांत माझ्या हातात रीतसर नेमणूकपत्र पडलं.

रानडेसरांचं ऑफिस एनसीपीएच्या प्रशासकीय इमारतीत पहिल्या मजल्यावर होतं. सुबक अन् टापटीप. उदबत्तीचा गंध दिवसभर ऑफिसात दरवळत असायचा. त्यांच्या कार्यालयाला लागून ग्रंथ आणि ध्वनिफीत संग्रहालय. श्रीमती मडिमन या ग्रंथपाल होत्या. लेले नावाचे एक गृहस्थ रानडेसरांचे सचिव म्हणून काम पाहत.


एनसीपीएत रुजू झालो आणि झेरॉक्सिंगचं लचांड मागे लागलं. दाते सूचीचा आधार घेऊन मराठी रंगभूमीविषयक दुर्मिळ लेख झेरॉक्स करायचं ते काम होतं. त्यासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जावं लागायचं. याकामी ग्रंथसंग्रहालयाच्या लतिका जोशी, मनोहर

# लोकमुद्रा

पारायणे यांचं मोलाचं सहकार्य मिळालं. हे काम महिनाभर सुरू होतं. यानिमित्तानं मराठीतली अनेक जुनी, अनमोल मासिकं पाहायला-वाचायला मिळाली. जाडजूड ग्रंथ उचलावे- ठेवावे लागत. असं सारखं सारखं करावं लागायचं. त्यामुळे थोडा व्यायामही झाला!

झेरॉक्स केलेल्या लेखांची संख्या बरीच झाली. हा सगळा मजकूर विषयवार संकलित करायचा, मग फायलिंग करायचं, असं बरंच काही माझं काम सुरू असायचं. डॉ. रानडेंचं कामावर लक्ष असायचं. सगळा मजकूर ते बारकाईनं नजरेखालून घालत. एखादा विशेष लेख असला की त्यावर आपलं मत सांगत. माझं म्हणणं विचारत.

वामन केंद्रे, विजय केंकरे, जितेन मर्चंट आणि मी अशी आमची टीम होती. डॉ. रानडे अधनंमधनं आम्हाला चर्चेमध्ये बोलावत. कामाचा एक सर्वसाधारण आढावा, पुढच्या कामाचं वेळापत्रक निश्चित करणं, त्यासंबंधी सूचना असं या बैठकीचं स्वरूप असायचं. आपलं मत मनमोकळेपणानं मांडायची आम्हाला मुभा होती. या सवलतीचा आम्ही पुरेपूर फायदा घ्यायचो. आमच्यापैकी एखादा आपलं म्हणणं मांडू लागला की डॉ. रानडेंच्या चेहऱ्यावर एक मंद स्मित असायचं. त्यांच्या या amused expression ची मला गंमत वाटायची... आजही वाटते. आम्ही चौघे तरुण होतो. संशोधनाचा जो पट रानडे आमच्यासमोर उलगडत होते तो पाहून आम्ही (निदान मी) गांगरून गेलो होतो. हे सगळं आम्हाला नवीन होतं. मात्र, अननुभवी असूनही आमचा उत्साह दांडगा होता. आमची दिव्य मतं ऐकून रानडेसरांची तेव्हा बरीच करमणूक झाली असणार. त्यांनी आम्हाला कधी अटकाव केला नाही, हे विशेष. डॉ. रानडे टीमचे कॅप्टन होते. ते कॅप्टनसारखेच वागले, बॉससारखे नाही, हे आवर्जून नमूद करावंसं वाटतं. ते आमचं म्हणणं शांतपणे ऐकून घेत. मग आमच्या प्रत्येक मुद्द्याचा यथायोग्य परामर्श घेत अन् आपलं म्हणणं काय आहे, हे सांगत. तो अखेरचा शब्द असे. प्रकल्पाचा पसारा पुढे कसा घेऊन जायचा, याचा एक स्पष्ट, रेखीव आराखडा त्यांच्याकडे होता. ध्येयापासून विचलित करणारी एकही सूचना ते मान्य करत नसत. फाजील लोकशाही त्यांना मान्य नव्हती. आणि आज मला वाटतं- त्यांचं बरोबर होतं.




मुंबईच्या प्रसारमाध्यमांना 'रंगभूमी विकास प्रकल्पा'ची सविस्तर माहिती द्यावी आणि एनसीपीएत एक पत्रकार परिषद घ्यावी, असं एकदा जितेन मर्चंटच्या मनात आलं. मी वर्तमानपत्रात असल्यामुळे त्याने मला विश्वासात घेतलं. आम्ही दोघं डॉ. रानडेंकडे गेलो. त्यांनी आमचं ऐकून घेतलं आणि 'या सगळ्याची आता काही गरज नाही,' असं म्हणाले. त्यावर जितेननं युक्तिवाद केला... 'पेपरात छापून आलं तर आपलं काम खूप सोपं होईल. नवीन माहिती आपल्याकडे येईल.' त्यावर डॉ. रानडे म्हणाले : 'आपल्याकडे सध्या भरपूर मटेरियल आहे. त्याचं आधी काय ते करू. मग पुढचं करू.' दुसऱ्या दिवशी डॉ. रानडे मला म्हणाले : ' वर्तमानपत्रांना तात्कालिक गोष्टींमध्ये रस असतो. आपलं काम पुढच्या पिढ्यांसाठी आहे.' मी चमकलो, सर्द झालो अन् गप्प बसलो.

डॉ. रानडे मोजकं बोलत. प्रत्येक शब्द तोलून-मापून असायचा. त्यांची निरीक्षणं मार्मिक. त्यांचं मत कितीही अप्रिय वाटलं तरीही sheer force of argument व नर्म विनोदामुळे त्यांचं म्हणणं ऐकावंसं वाटायचं.

रंगभूमी विकास प्रकल्पाचं काम आस्ते आस्ते जोर धरत होतं. काही बुजुर्ग कलावंतांच्या मुलाखती ध्वनिमुद्रित झाल्या. दुर्मिळ फोटोंचं संकलन झालं. वसंत आबाजी डहाकेंच्या एका अनुवादित नाटकाचं वाचन झालं. याच काळात एनसीपीएनं 'मानापमानातील गाणी' हा दीर्घकाळ स्मरणात राहील असा एक दर्जेदार, बहारदार कार्यक्रम सादर केला. विजय, वामन, मी या कार्यक्रमाच्या तालमींना सहाय्यक म्हणून हजर असायचो. कागदावर आखलेला कार्यक्रम रंगमंचापर्यंत कसा जातो, ती वाटचाल कशी होत असते, याचा थोडा अंदाज आला. पु. ल. देशपांडे आणि डॉ. रानडेंच्या निरुपणामुळे कार्यक्रमाला बालगंधर्वांनी एका वेगळ्याच कार्यक्रमाच्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे 'सुंदर मजा' आली. 'संगीत मानापमान' केंद्रस्थानी ठेवून त्याच्या अवतीभोवतीचा, आगचा-मागचा परिसर स्वच्छ करत करत डॉ. रानडे अभिजात मराठी रंगभूमीचं मर्म अतिशय रेखीवपणे समजावून सांगत. त्यावर पु. लं. चं भाष्य म्हणजे icing on the cake. मराठी रसिकांनी या कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.

पु. ल. देशपांडे- डॉ. अशोक रानडे ही hyphenated partnership म्हणजे जागतिकीकरणाच्या भक्ष्यस्थानी पडण्यापूर्वी अस्सल, प्राणवान मराठी संस्कृतीनं साजरा केलेला एक उत्कट, बहारदार उत्सव! संस्कृतीची प्रक्रिया ही संथ-खोल अन् अर्थगर्भ असते. गळा काढणं, छाती बडवणं किंवा झेंडे फडकावणं तिला मान्य नसतं. परंतु जागतिकीकरणानं देशी संस्कृतीतला हा कोवळा गर जाळून टाकला. त्यामुळे दोन विपर्यास घडले. एक- टी. व्ही., जाहिरात आणि इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्यांनी गल्लाभरू आणि थिल्लर संस्कृतीचं घाऊक कंत्राट घेऊन सगळा विचका करून टाकला. दोन- मराठी अस्मितेच्या नावानं डरकाळ्या फोडून काही राजकीय शक्तींनी मतं मिळवली अन् संस्कृती, भाषा या प्रांतात ढवळाढवळ सुरू केली. हे सगळं घडत असताना एनसीपीएचं वागणं जबाबदारीचं नव्हतं. ही राष्ट्रीय संस्था दक्षिण मुंबईत अडकून पडली. करमणूकप्रधान इंग्रजी- गुजराती नाटकांचा सपाटा एकीकडं लावत असताना एनसीपीएनं 'चौराहा' वगैरे प्रयोग केले. त्यामुळे परदेशी विद्यापीठांच्या शिष्यवृत्त्या, फॉरिन फिल्म फेस्टिव्हल यांच्याकडे डोळे लावून बसलेल्या अन् फाडफाड इंग्रजी बोलणाऱ्या 'किंचित कलावंत' अशा मंडळींची तिथे एक 'अहो रूपं, अहो ध्वनिः' असा क्लब तयार झाला. असो.

तिथं काम करत असताना व्यावसायिक शिस्त, काटेकोरपणा, वक्तशीरपणा, कामावर श्रद्धा ही मूल्यं मनात खोलवर रुजली. चांगल्या मैफिली ऐकायला मिळाल्या. चांगले सिनेमे पाहायला मिळाले. गुणवान कलावंतांचा सहवास लाभला. याचं श्रेय डॉ. रानडेंचं. आणि डॉ. कुमुद मेहता, वृंदावन दंडवतेंचंसुद्धा.

डॉ. रानडेंसारखं व्हावं, संशोधनाच्या कामात स्वतःला झोकून द्यावं, असं वीस-बावीस वर्षांपूर्वी प्रकर्षानं वाटायचं. तसं झालं नाही. मीच माझा विरस केला. म्हणजे तशा अर्थानं मी डॉ. रानडेंचा शिष्य नाही. परंतु त्यांच्याकडून जे थोडंबहुत शिकलो ते आचरणात आणत असतो. संशोधक झालो नाही. संशोधनाची थोडीफार शिस्त अंगी आली असावी असं वाटतं. म्हणजे माझं घराणं डॉ. रानडेंचंच!

■ **अंबरीश मिश्र**

(डॉ. अशोक रानडे यांच्यावरील प्रस्तावित गौरवग्रंथातून साभार)